<u>उलटतपास गैरअर्जदाराकरीता विधीज्ञ श्री.एस.एच. चुडीवाल यांच्या वतीने शपथेवर सुरु</u> -

१२. माझे Diploma in Nursing असे शिक्षण झालेले आहे. मी सध्या परिचारीका म्हणून कुठेही काम करत नाही. माझे एसबीआय बँकेत खाते असून मी माझ्या बँकेचा खाते उतारा या प्रकरणात दाखल करण्यास तयार आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सध्या शिरसाठ हॉस्पीटलमध्ये परिचारीका म्हणून काम करते. हे म्हणणे खरे आहे की, ज्या धर्म गुरूनी आमचे लग्न लावले त्यांनी आमच्या लग्नाचे प्रमाणपत्र दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या कुटूंबातील सदस्यांनी गैरअर्जदाराची संपूर्ण माहिती घेतल्यानंतर आमचा विवाह केला. हे म्हणणे खरे आहे की, पुष्पा दिगंबर ढाणे ही माझी मावशी आहे. ती पुण्यात राहते. तिने नगर येथील तिच्या खोल्या भाडयाने दिलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मावशीने आमच्या विवाहाची मध्यस्थी केली होती. आता मला माझ्या मुळ अर्जातील रेखांकीत भाग-अ वाचून दाखविला असता तो खरा व बरोबर नाही. साक्षीदार स्वतः सांगते की, अर्जामध्ये तिच्या मावशीने स्थळ सूचविले होते ही बाब नमूद करायची होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मावशीने चौकशी केल्यानंतरच स्थळ सूचविले असेल. हे म्हणणे खरे नाही की, अर्जामध्ये तिच्या मावशीने स्थळ सूचविले होते ही बाब नमूद करायची होती हे मी खोटे सांगते.

<u>न्यायालयाची वेळ संपल्यामुळे पुढील उलटतपास तहकूब</u>.

श्रवणोत्तर स्विकृत,

ASHISH BIHARILAL MARLECHA
Digitally signed by ASHISH BIHARILAL MARLECHA
Date: 2026.01.05 17:15:57 +0530

(आशिष बि. मरलेचा)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
श्रीरामपुर, जि.अहमदनगर

दिनांक ०५/०१/२०२६